**जिल्हा शल्यचिकित्सक,**
**छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, दसरा चौक, कोल्हापूर. ४१६००२.**
**नर्मदा इमारत, ग्रामीण रुग्णालय नियंत्रण कक्ष,**
फोन नं.०२३१- २६४४२३३ (कार्या.)
ई - मेल. DEICkolhapurSHKB@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.जिशचिको/ग्रारुनिक/DEIC/दरपत्रके/
/9286/२५.दिनांक:-02 /06/२०२५.

## दरपत्रक सूचना

**विषय - जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर अंतर्गत डीईआयसी विभागासाठी सोबत जोडलेल्या तपासणीकरीता, (Diagnostic Test) दरपत्रके सादर करणेबाबत.**

जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर अंतर्गत डीईआयसी विभागासाठी सन २०२५-२६ करीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे तपासणीकरीता (Diagnostic Test) उपलब्ध असलेली तपासणी केंद्रे/संस्था/ खाजगी रुग्णालये यांचेकडून विहित नमुन्यात दरपत्रके मागवित आहोत. सदर दरपत्रक मा.संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई यांचे http://nrhm.maharashtra.gov.in/tenders.htm या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

### दरपत्रकाकरीता नियोजीत कालावधी

| अ.क्रं | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | मोहोरबंद दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | दि.03/06/२०२५ ते दि.10 /06/२०२५ (कार्यालयीन वेळेत) |
| २ | दरपत्रके उघडणे व मुल्यांकनाचा दिनांक | दि. 11 /06/२०२५ दुपारी ३.०० वाजता. |
| ३ | कार्यालयाचा पत्ता | जिल्हा शल्यचिकित्सक, कार्यालय ग्रामीण रुग्णालय नियंत्रण कक्ष, सीपीआर हॉस्पिटल, कोल्हापूर. |
| ४ | अंदाजित रक्कम रु. | ५०,०००/- |

### दरपत्रके सादर करावयाच्या सर्वसाधारण अटी व शर्थी

१)एका दरपत्रक धारकाने एकच दरपत्रक सादर करावे.

२) दरपत्रक संस्थेच्या लेटरहेडवर सही व शिक्क्यासह सादर करावे, तसेच त्यावर GST क्रमांक नमुद करण्यात यावा. सोबत जीएसटी प्रमाण पत्र सादर करण्यात यावे.. GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद करणेत आलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे.

३) दरपत्रकासोबत वैद्य नोंदणी प्रमाणपत्र (Licence Certificate), शॉप ॲक्ट लायसन्स व पॅन कार्ड छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक आहे.

CamScanner

४) ROP (Retinopathy of prematurity) तपासणीकरीता नेत्रतज्ञ यांचे रेटीना च्या आजाराकरीता विशेष प्रशिक्षण घेतलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (Retina fellowship, Retina specialist)

५) डीईआयसी विभागाकडून सदर तपासणीकरीता संदर्भित केलेल्या बालकांचे सर्व रिपोर्ट याची हार्ड कॉपी डीईआयसी विभाग व संदर्भित बालकांच्या पालकांना तपासणी केलेपासून ४ ते ६ तास या कालावधीत उपलब्ध करुन देणे. व सदर तपासणी झालेनंतर तात्काळ त्याचा रिपोर्ट DEICkolhapurSHKB@gmail.com या संकेतस्थळावर पाठविणे आवश्यक आहे.

६)सदर संदर्भित बालकांची फेरतपासणी करताना डीईआयसी तज्ञ यांची पूर्व परवानगी घेणेत यावीत व त्याची सविस्तर माहिती डीईआयसी विभाग, सेवा रुग्णालय कसबा बावडा, कोल्हापूर यांना ई - मेल करण्यात यावी.

७) तपासणी करीता संदर्भित होणाऱ्या बालकांचा पाठपुरावा डीईआयसी विभागाकडून केला जाईल याची नोंद घ्यावी.

८)सदर तपासणी केंद्र/ संस्था/ खाजगी रुग्णालय स्थानिक स्तरावर असणे गरजेचे आहे.

९) **दरपत्रक पोहोच करणेचे ठिकाण:-** जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय ग्रामीण रुग्णालय नियंत्रण कक्ष, सीपीआर हॉस्पिटल, कोल्हापूर. कोल्हापूर येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत. (सुट्टी वगळता) पर्यंत प्रत्यक्ष अथवा पोस्टाने दरपत्रके पोहोच करणेत यावीत.

१०) दरपत्रक सादर करु इच्छिणाऱ्यांनी http://nrhm.maharashtra.gov.in/tenders.htm या संकेतस्थळावर भेट दयावी. तसेच नमुद तपासणी संदर्भात आवश्यक माहिती करीता डीईआयसी विभाग सेवा रुग्णालय, कसबा बावडा, कोल्हापूर या ठिकाणी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क करावा.

११)कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रके स्वीकारणे अथवा पूर्णत: नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा तसेच नमुद तपासणीची संख्या कमी/ अधिक करण्याचा अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर यांनी स्वत:कडे राखून ठेवलेला आहे. त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्र व्यवहार केला जाणार नाही.

दरपत्रक बाबतच्या माहितीसाठी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा.

- वेबसाईट:- http://nrhm.maharashtra.gov.in/tenders.htm
- ई मेल :- DEICkolhapurSHKB@gmail.com
- दुरध्वनी क्रमांक :- ०२३१ - २६०४०८०

आदेशावरुन,
सही/-

(डॉ.सुप्रिया देशमुख)
जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर.

CamScanner

जिल्हा शल्यचिकित्सक,
छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, दसरा चौक, कोल्हापूर. ४१६००२.
नर्मदा इमारत, ग्रामीण रुग्णालय नियंत्रण कक्ष,
फोन नं.०२३१- २६४४२३३ (कार्या.) फोन नं./फॅक्स नं ०२३१-२६४३४६४(औभा)
ई - मेल. . DEICkolhapurSHKB@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.जिशचिको/ग्रारुनिक/DEIC/दरपत्रके/
/9 28/२४.दिनांक:-02 /06/२०२५.

## तपासणी यादी

| अ.क्र | तपासणीचे नाव | प्रति तपासणीचे दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| 1 | ROP (Retinopathy of prematurity) | |

आदेशानुसार

(डॉ.सुप्रिया देशमुख)
जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर.

CamScanner